# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २६/०७/२०२२

## जिल्हा : पुणे

### मागील आठवडयाचे हवामान :

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान २६.० ते २८.८ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २१.५ ते २२.२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ८५ ते ९५ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ६८ ते ८६ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ४.२ ते ६.१ कि.मी. होता. मागील आठवड्यात ११.७ मिमी पाऊस झाला.

**हवामान अंदाज :** पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान २९ ते ३२ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २१ ते २३ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ८६ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ५६ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०९ ते १५ कि.मी. दरम्यान राहील. आकाश ढगाळ ते पूर्णतः ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा वायव्येकडून आग्न्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (२०/०७/२०२२ ते २६/०७/२०२२) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२६/०७/२०२२ ते ३०/०७/२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | दिनांक | 27 | 28 | 29 | 30 | 31 |
| 0.2 | 0.1 | 1.2 | 0.0 | 5.3 | 0.9 | 4.0 | पाऊस (मिमी) | 11 | 19 | 16 | 10 | 9 |
| 28.5 | 28.2 | 28.6 | 28.8 | 27.3 | 26.0 | 28.4 | कमाल तापमान (अं.से.) | 29 | 30 | 31 | 31 | 32 |
| 21.7 | 21.8 | 22.0 | 22.1 | 21.5 | 22.2 | 21.9 | किमान तापमान (अं.से.) | 21 | 22 | 22 | 23 | 23 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 8 | 8 | 7 | 6 | 6 |
| 90 | 90 | 88 | 90 | 95 | 85 | 87 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 86 | 86 | 87 | 86 | 85 |
| 83 | 71 | 70 | 86 | 81 | 68 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 63 | 65 | 53 | 53 | 48 |
| 5.2 | 5.2 | 4.7 | 6.1 | 5.2 | 4.2 | 4.3 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 13 | 9 | 11 | 12 | 15 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 283 | 292 | 292 | 292 | 291 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २६, २७ व २८ जुलै, २०२२ रोजी काही ठिकाणी तर दिनांक २९ व ३० जुलै, २०२२ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दि. २६, २७ व २८ जुलै, २०२२ रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट, सोसाट्याच्या वाऱ्यासह (वाऱ्याचा वेग ताशी ३०-४० कि.मी.) पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ३१ जुलै, २०२२ ते ०७ ऑगस्ट, २०२२ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |

| | | |
|---|---|---|
| सामान्य सल्ला | | • शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट, सोसाट्याच्या वाऱ्यासह (वाऱ्याचा वेग ताशी ३०-४० कि.मी.) पावसाची शक्यता असल्याने फवारणी पुढे ढकलावी किंवा पावसाचा अंदाज बघून पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व विजेचा पूर्वानुमाना करीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• जिल्हयातील पूर्व भागात पडणा-या पावसाचे पाणी शेतात साठवण्यासाठी/ मुरविण्यासाठी उपाय योजना करावी. |
| खरीप पिके | आंतरमशागत | पेरणी करून १० ते १५ दिवस झालेल्या पिकामध्ये मशागतीयोग्य परिस्थिती असल्यास लोखंडी कोळप्याने कोळपणी किंवा खुरपणी करावी. त्यामुळे तण नियंत्रण व ओलावा टिकून राहण्यास मदत होईल. |
| भात | लागवड | भात पिकाच्या लागवडीसाठी भात खाचरात चिखलणी करून, २१ दिवस पूर्ण झालेल्या रोपांची लागवड करावी. खोडकीडीच्या नियंत्रणासाठी पुर्नलागवडीपूर्वी रोपांची मुळे क्लोरोपायरीफॉस २०% ई.सी., ०.१% द्रावणात १२ तास बुडवून ठेवावीत. नवीन लागण केलेल्या भात खाचरात रोपे स्थिर होईपर्यंत पाण्याची पातळी १ ते २ सें.मी. ठेवावी. तसेच ज्या ठिकाणी लागवड केलेली रोपे प्राथमिक अवस्थेत आहेत तेथे २-३ सें.मी पाण्याची पातळी ठेवावी. भातरोपांची पुनर्लागवड झालेल्या ठिकाणी तणनियंत्रणासाठी ब्युटाक्लोर ५० ईसी किंवा बेंथिओकार्ब ५० ईसी १.५ किलो ५०० लि टर पाण्यात मिसळून लावणीनंतर १ आठवड्याच्या आत फवारावे. तणनाशक फवारणी पुर्वी खाचरातील संपुर्ण पाणी काढून टाकावे व दुस-या दिवशी पुन्हा पाणी भरावे. |
| सोयाबीन | पिक वाढीची अवस्था | पीक उगवणीनंतर १५ ते २० दिवसांनी एक कोळपणी व नंतर खुरपणी करुन शेत तणमुक्त ठेवावे. अथवा पीक उगवणीनंतर २१ दिवसांनी प्रति हेक्टरी इमॅझेथायपर क्रियाशील घटक ०.१ ते ०.१५ किलो ५०० ते ६०० लिटर पाण्यामध्ये मिसळून तणांवर फवारावे. |
| मका | उगवण ते पिक वाढीची अवस्था | पेरणी संपताच वाफशावर ॲट्राटाप (५० टक्के) तणनाशक एका हेक्टरसाठी दोन किलो या प्रमाणात प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून समप्रमाणात जमिनीवर फवारावे. पीक उगवत असताना कोवळे कोंब पक्षी उचलतात म्हणून पेरणीनंतर सुरवातीच्या १०-१२ दिवसांपर्यंत पक्ष्यांपासून संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मका पेरणीनंतर सुरवातीच्या २० दिवसांपर्यंतच्या कालावधीत पिकात जास्त पाणी किंवा दलदलीची स्थिती असल्यास कोवळी रोपे पिवळी पडून मरतात. कारण मक्यांची रोपावस्था या स्थितीस खूपच संवेदनशील आहे. म्हणून पेरणीनंतरच्या सुरवातीच्या २० दिवसांपर्यंतच्या काळात पिकात पाणी साठून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| तुर | उगवण ते पिक वाढीची अवस्था | तूर पिकात पेरणीनंतर उगवण न झालेल्या रिकाम्या जागी नांग्या भरण्याची कामे करावीत. पेरणी झालेल्या क्षेत्रात योग्य रोपांची संख्या राखण्यासाठी पिकाची विरळणी करावी जेणेकरून जमिनीतील ओलावा व अन्न्द्रव्यासाठी पिकांची परस्परांशी स्पर्धा होणार नाही. |
| मुग उडीद | पिक वाढीची अवस्था | पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी पहिली आणि ३० ते ३५ दिवसांनी दुसरी कोळपणी करावी. कोळपणी नंतर दोन रोपातील तण काढण्यासाठी गरजेनुसार खुरपणी करावी. |
| भेंडी व टोमॅटो | फळधारणा | भेंडी व टोमॅटोवरील फळपोखरणा-या अळीच्या व्यवस्थापनासाठी किडलेली फळे मातीत पुरुन टाकावीत तसेच डेल्टामेथ्रीन २.८ % ईसी ८ मिली किंवा क्विनॉलफॉस २५ % ईसी २० मिली किंवा लॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ५% ईसी ६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| ऊस | लागवड अवस्था | अडसाली ऊस लागवडीसाठी जमिनीची पूर्वमशागत करून रानबांधणी आखणी पूर्ण करावी. अडसाली ऊस लागण करताना को ८६०३२ व को एम ०२६५ या शिफारशीत जातींचा वापर करावा. |

| | | |
|---|---|---|
| केळी | | बागेतील जमिन स्वोच्छर व भुसभुशित ठेवावी. त्यांकरिताउभी आडवी कुळवणी करावी. दर ३ महिने अंतराने टीचणी बांधणी करावी. झाडांना मातीची भर द्यावी. केळीच्याि बुंध्याुलगत अनेक पिले ये लागतात. ती वेळच्याू वेळी धारदार कोयत्याने नियमित काढून टाकावीत. केळीची रोगग्रस्त पाने कापून बागेबाहेर नष्ट करावीत. हिरवी पाने कापू नयेत. आवश्यीकता भासल्याोस झाडास आधार द्यावा. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जनावरांच्या गोठया भोवती पाणी साठणार नाही तसेच गोठ्यात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी. जंताच्या व विविध आजाराच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक व लसी जनावरांना पाजावे/ टोचून घ्यावे. लाळखुरकत, फऱ्या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोग प्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : २६.०७.२०२२

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**